पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३०६४ दि. २२ /०९ /२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**रिक्षामध्ये पॅसेंजरचे विसरून राहीलेलं महागडे मोबाईल फोन प्रामाणिकपणे रिक्षा चालकाने पोलीस ठाणेस आणुन दिले, पोलीसांनी मुळमालकाचा शोध घेवून मोबाईल फोन परत केले.**

दि. १७.०९.२०१९ रोजी दिवसपाळी कर्तव्यावर ठाणे अंमलदार म्हणुन सपोनि कोळी असे हजर असताना, इसम नामे चंद्रगुप्त बुच्छय्या श्रीराम वय ६५ वर्षे व्यवसाय – रिक्षाचालक रा. ११९३ भवानी पेठ पुणे मो.क्र. ९८२३०८५६२५ यांनी पोलीस ठाणेस येवून कळविले की, टिंबर मार्केट येथून दोन पॅसेंजर मधून बसले व पुढे स्वारगेट येथे उतरले सदर इसमांचे महागडे मोबाईल फोन रिक्षामध्ये विसरले असून त्यांचा शोध घेतला असता मिळुन न आल्याने ते जमा करण्यासाठी पोलीस ठाणे येथे आलो असल्याचे सांगितले.

नमुद अधिकारी यांनी सदरचे मोबाईल फोन ताब्यात घेवून मुळ मालकाचा शोध घेतला असता, सदरचे मोबाईल फोन श्री. रोहन दादासाहेब गायकवाड वय २८ वर्षे रा. हिंगणे-खुर्द, साईनगर सिंहगड रोड पुणे मो.क्र. ९५१११०००७२ यांचा असल्याचे समजले. सदर इसमास पोलीस ठाणे येथे बोलावुन घेवून सदरचे मोबाईल फोन बाबत योग्य ती खातरजमा करून सदरचे महागडे मोबाईल फोन मुळ मालक रोहन गायकवाड यांचे ताब्यात देण्यात आलेले आहेत. पोलीसांनी व रिक्षाचालकाने त्यांचे मोबाईल फोन परत मिळवुन दिलेबद्दल त्यांनी आभार मानले.



**रिक्षाचालक - श्री. चंद्रगुप्त बुच्छय्या श्रीराम**




**मोबाईल मालक - श्री. रोहन दादासाहेब गायकवाड**